|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव, (प्रतिनिधी) दि. २२ सप्टेंबर: नोकरी, व्यवसाय किंवा कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळत उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थी व नागरिकांसाठी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या दूरस्थ आणि ऑनलाइन शिक्षण केंद्रातर्फे एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. 'चार भिंतींच्या पलीकडचे शिक्षण : दूरस्थ शिक्षण पद्धतीद्वारे करिअर आणि उच्च शिक्षणाची वाटचाल' हा कार्यशाळेचा मुख्य विषय आहे. सोमवार, दिनांक २८ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता विद्यापीठ परिसरातील अधिसभा सभागृहात ही कार्यशाळा होणार आहे.

दरम्यान, दूरस्थ शिक्षण ब्युरो, विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्याकडून ऑगस्ट २०२६ मध्ये दूरस्थ आणि ऑनलाइन शिक्षण केंद्रांतर्गत एम.ए. इतिहास तसेच एम.ए. संरक्षण व सामरिकशास्त्र हे दोन पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्यास अधिकृत मान्यता मिळाली आहे.

या कार्यशाळेत नोकरी किंवा कौटुंबिक व्यवसाय सांभाळत उच्च शिक्षण कसे पूर्ण करता येईल, पदवी किंवा पदव्युत्तर शिक्षण घेत असतानाच करिअरच्या संधी कशा विकसित करता येतील, तसेच दूरस्थ शिक्षणातून उपलब्ध होणाऱ्या रोजगाराच्या संधी याबाबत या क्षेत्रातील राष्ट्रीय स्तरावरील तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. कार्यशाळेच्या निमित्ताने दूरस्थ शिक्षणाद्वारे विविध मान्यताप्राप्त अभ्यासक्रम उपलब्ध करून देणाऱ्या महाराष्ट्रातील नामांकित संस्था व विद्यापीठांचे माहितीपर स्टॉल्सही उभारण्यात येणार आहेत. हे स्टॉल्स दिवसभर सर्वांसाठी खुले राहणार असून इच्छुकांना विविध अभ्यासक्रम व शैक्षणिक संधींची माहिती घेता येणार आहे.

या कार्यशाळेस पदवी स्तरावरील विद्यार्थी, प्राथमिक व माध्यमिक शिक्षक, महाविद्यालयीन अध्यापक, नोकरदार व्यक्ती तसेच उच्च शिक्षण घेण्यास इच्छुक नागरिक सहभागी होऊ शकतात. विद्यार्थ्यांसाठी नोंदणी मोफत, तर शिक्षक व नोकरदारांसाठी नोंदणी शुल्क १०० रुपये आहे. इच्छुकांनी पूर्वनोंदणी करून २८ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता अधिसभा सभागृहात उपस्थित राहावे, असे आवाहन विद्यापीठातर्फे करण्यात आले आहे.

**बातमी क्र. २**

जळगाव, (प्रतिनिधी) दि. २२ सप्टेंबर: शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजनांची विद्यार्थ्यांना माहिती मिळावी, योजनांची पात्रता, आवश्यक कागदपत्रे आणि अर्ज प्रक्रिया समजावी, या उद्देशाने कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील सामाजिक शास्त्रे प्रशाळेच्या वतीने 'शिष्यवृत्ती जनजागृती कार्यक्रमाचे' आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सामाजिक शास्त्रे प्रशाळेचे संचालक प्रा. उमेश गोगडिया होते. समाजकार्य विभागातील सहाय्यक प्राध्यापक प्रा. विनेश पावरा यांनी प्रमुख वक्ते म्हणून विद्यार्थ्यांना भारत सरकारच्या शिष्यवृत्ती योजना तसेच विविध शासकीय शिष्यवृत्ती योजनांबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

यावेळी प्रा. विनेश पावरा यांनी महाडीबीटी शिष्यवृत्ती पोर्टलच्या २.० आवृत्तीबाबत विद्यार्थ्यांना माहिती दिली. जुन्या पोर्टलवरील माहिती व डेटा नव्या पोर्टलवर हस्तांतरित करण्याची प्रक्रिया सुरू असल्याने सध्या पोर्टल काही प्रमाणात संथ चालत असल्याचे त्यांनी सांगितले. असे असले तरी विद्यार्थ्यांनी ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत शिष्यवृत्तीचे अर्ज ऑनलाइन भरावेत, असे आवाहन त्यांनी केले.

अध्यक्षीय समारोप करताना प्रा. डॉ. उमेश गोगडिया यांनी शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजना विद्यार्थ्यांचा सर्वांगीण शैक्षणिक विकास व्हावा आणि त्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण घेता यावे, या उद्देशाने राबविल्या जात असल्याचे सांगितले. 'शिष्यवृत्ती हा विद्यार्थ्यांचा हक्क असून विद्यार्थ्यांनी याबाबत जागरूक राहणे आवश्यक आहे,' असे त्यांनी नमूद केले. शासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात येणाऱ्या निर्देशांचे पालन करून विद्यार्थ्यांनी निर्धारित मुदतीत शिष्यवृत्ती अर्ज सादर करावेत. अर्ज भरताना आवश्यक माहिती अचूक व काटेकोरपणे भरावी, असे आवाहनही त्यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन शिष्यवृत्ती समन्वयक डॉ. विजय घोरपडे यांनी केले. कार्यक्रमास सामाजिक शास्त्रे प्रशाळेतील विविध विभागांतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

कबचौउमवि / १६/ जनसंपर्कविभाग / २०२६ दि. २२ सप्टेंबर, २०२६

प्रती,
मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया,उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी,ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता